सकाळ

# दूरशिक्षण केंद्र अभ्यासक्रमात भारी

**संदीप खांडेकर :** सकाळ वृत्तसेवा

**विद्यापीठ व अभ्यासक्रम असे :**

- शिवाजी विद्यापीठ- १३
- महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ- १२
- एस.एन.डी.टी. - ९
- डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठ (मुंबई)- ९
- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ - ३२.



कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठाचे दूरशिक्षण केंद्र राज्यात अव्वल ठरले आहे. विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे केंद्राच्या १३ पैकी १३ अभ्यासक्रमांना मान्यता मिळाली असून, एकूण पाच ॲकॅडमिक विद्यापीठांतील दूरशिक्षण केंद्रांपेक्षा हा आकडा मोठा आहे. केंद्राने सातत्यपूर्ण केलेल्या यशस्वी कामगिरीचा हा परिणाम मानला जात आहे. विशेष म्हणजे, मुंबई, एमएटीएस (छत्तीसगड) व मनिपाल (सिक्कीम) विद्यापीठांना दूरशिक्षण केंद्राच्या मान्यतेसाठी अद्याप प्रतीक्षा करावी लागत आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात ३२ अभ्यासक्रम चालवले जातात, हे विद्यापीठच मुळात मुक्त विद्यापीठ आहे. शिवाजी विद्यापीठाने नियमित अभ्यासक्रमांचे शिक्षण देताना त्याला दूरशिक्षण केंद्राची जोड दिली आहे. नोकरदार, महिला, काम करून शिकणारे विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक

पान २ वर »

> विद्यापीठाने सातत्यपूर्ण केलेला पाठपुरावा व नियोजन पद्धतीने चालविलेले अभ्यासक्रम यामुळे 'यूजीसी'ने सर्व १३ अभ्यासक्रमांना मान्यता दिली.
> - डॉ. विलास नांदिवडेकर, कुलसचिव.

Kolhapur, Kolhapur-Today
07/01/2019 Page No. 1

सकाळ

# दूरशिक्षण केंद्र अभ्यासक्रमात भारी

» पान १ वरून

या केंद्रातून शिक्षण घेत आहेत. काही महिन्यांपूर्वी यूजीसीने दूरशिक्षण केंद्रांच्या अभ्यासक्रमांची मान्यता रद्द केली होती. शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रातील विद्यार्थी या निर्णयाने अस्वस्थ झाले होते. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर व परीक्षा भवनमधील उपकुलसचिव डॉ. पी. एस. पांडव यांनी अभ्यासक्रमांना मान्यता मिळवून आणण्यासाठी दिल्लीच्या तीन वेळा वाऱ्या केल्या.

यादरम्यान, पांडव यांच्याकडे दूरशिक्षण केंद्राचा उपकुलसचिव पदाचा अतिरिक्त कार्यभार होता. डॉ. नांदवडेकर यांच्याबरोबर दिल्लीला जाऊन दूरशिक्षण केंद्राच्या कामगिरीचा आढावा घेतला. त्यामुळे बी.ए, बी.कॉम, एम. कॉम, एम.बी.ए, एम. ए. मराठी, एम.ए. हिंदी, एम.ए. पॉलिटिक्स, एम. ए. इतिहास, एम. ए. समाजशास्त्र या नऊ अभ्यासक्रमांना तत्काळ मान्यता मिळाली. इंग्रजी, इकॉनॉमिक्स, मॅथेमॅटिक्स, एम. कॉम. इव्हल्युशन ऑफ रिअल इस्टेट या विषयांची मान्यता मिळालेली नव्हती. ती मिळाल्याने अन्य विद्यापीठांपेक्षा विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राच्या अभ्यासक्रमांचा आकडा जास्त झाला आहे.